SPECIAL ISSUE No. 105

ISSN 2349-638x
Impact Factor 7.149

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

Chief Editor
Shri. Pramod Tandale

Executive Editor
Prof. Dr. Sunita Shinde

Co-Editor
Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 35. | भास्कर ढोके | बकऱ्याची बॉडी - समकाळाचे भान असलेली कथा | 148 |
| 36. | डॉ. रमेश अर्जुन शिंदे | जागतिकीकरणातील अस्वस्थ वर्तमानाच्या कथा : ब्लॉगच्या आरशापल्याड | 154 |
| 37. | श्री. राहुल देवीदासराव फाटकर | बाबाराव मुसळे यांच्या कथेतील स्त्रीजीवन | 159 |
| 38. | सूर्यकांत श्रीधर आदलिंगे | जयंत पवार यांचा कथासंग्रह : वरनभात लोन्चा नि कोन नाय कोन्चा | 163 |
| 39. | डॉ. एम. ए. कव्हळे | जागतिकीकरणाचे वास्तव चित्रण करणारी कथा : ब्रँड फॅक्टरी | 167 |
| 40. | डॉ. कैलास इंगळे | टंचाई - उद्ध्वस्त ग्रामसंस्कृतीचा आलेख | 172 |
| 41. | डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक | आसाराम लोमटे यांच्या कथेतील 'आलोका'तील लोक | 175 |
| 42. | प्रा. डॉ. तुळशीराम उकिरडे | 'फुलवा' कथा संग्रहातील स्त्री वेदना | 179 |
| 43. | प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर | समकालीन जीवनातील नात्याचा वेध घेणारी कथा : मोराची बायको | 184 |
| 44. | ललिता मानसिंग गोपाळ | राजन खान यांच्या 'बाईजात' कथासंग्रहातील स्त्रीजीवन | 187 |
| 45. | प्रा. शरद बोराडे | बदलत्या ग्राम वास्तवतेचा 'दाखला' | 190 |
| 46. | प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | 'एका सुगीची अखेर' मधील कैलास दौंड यांची कथा : एक दृष्टिक्षेप | 193 |
| 47. | प्रा. डॉ. यशवंत हाके | ग्रामीण जीवनानुभवांचा संवेदनशील आविष्कार : पोशिंदा | 196 |
| 48. | डॉ. प्रशांत गुणवंतराव चौधरी | कलात्मकता आणि सामाजिकतेचा सुरेख संगम : रस्ता आणि इतर कथा | 201 |
| 49. | प्रोफेसर डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | मधुकर क्षीरसागर यांच्या कथांचे स्वरुप | 204 |
| 50. | डॉ. सी. एस. आवारे | स्त्रीवादी कथेमागील भूमिका | 207 |

# जागतिकीकरणाचे वास्तव चित्रण करणारी कथा : ब्रँड फॅक्टरी

- डॉ. एम. ए. कव्हळे
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि. बीड

मनोहर सोनवणे यांचा 'ब्रँड फॅक्टरी' नावाचा कथासंग्रह २०२० मध्ये विश्वकर्मा पब्लिकेशन यांनी प्रकाशित केला. या कथासंग्रहाला जागतिकीकरणाचे नेपथ्य आहे. जागतिकीकरणाने मानवाचे भावजीवन संपवून टाकले आणि माणसालाच वस्तू बनवले. या जागतिकीकरणामुळे कमालीची आशा निर्माण झाली, त्याचबरोबर कमालीचे दुःखही या जागतिकीकरणाने निर्माण केले. एकीकडे प्रगतीच्या पथावर चालत असल्याचा भास होत आहे; तर दुसरीकडे कमालीच्या निराशेच्या दरीमध्ये कोसळल्याचे वास्तव माणसासमोर येत आहे. जगणे प्रगत होत आहे की माणसाची अधोगती होत आहे याची निवड करण्यासाठी माणसाला वेळ नाही. फक्त पैसा, बाजार आणि बाजारवाद याच्यामध्ये माणसाचे माणूसपण हरवून गेल्याची वास्तवता 'ब्रँड फॅक्टरी'मधून मनोहर सोनवणे व्यक्त करतात.

जागतिकीकरण आले तेव्हा माणसाच्या मनामध्ये एक आशा निर्माण झाली. जगाचे एका छोट्याशा खेड्यामध्ये रूपांतर झाले. खासगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे माणसाचे जीवन उन्नत होईल आणि माणसे एका उंचीवर जातील, सर्व सुख सोयी त्याच्या झोळीमध्ये पडतील. अशा प्रकारची स्वप्ने दाखवली गेली; पण ही स्वप्ने काही काळातच भंग पावली. या जागतिकीकरणाने आमची संस्कृती, आमची मूल्यव्यवस्था पार हरवून टाकली. दुभंगलेले कुटुंब आणि ढसाळलेली मूल्यव्यवस्था घेऊन एका विशिष्ट अशा तणावामध्ये माणूस जगताना दिसत आहे. व्यवसायअस्थिर होत चालले आहेत, नोकऱ्या धुसर होत चालल्या आहेत. व्यवसाय करण्यासाठी आणि पैसा कमवण्यासाठी माणसाला खोटे बोलावे लागत आहे, माणसाची फसवणूक करावी लागत आहे. अशीही मूल्यव्यवस्था विरहित समाजव्यवस्था जागतिकीकरणाने आमच्या पुढे आणून ठेवली. याचे भान ज्यांना आहे ते या जागतिकीकरणाच्या व्यवस्थेच्या विरोधामध्ये लढताना दिसतात; पण अशीही काही माणसे आहेत जे या जागतिकीकरणाच्या प्रवाहामध्ये स्वतःला झोकून देण्यामध्ये धन्यता मानत आहेत. अशा माणसांचे उध्वस्त होत चाललेले जीवन, भावविश्व आणि जागतिकीकरणाचे वास्तव मनोहर सोनवणे यांनी आपल्या 'ब्रँड फॅक्टरी' नावाच्या कथासंग्रहामध्ये अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केले आहे. या कथासंग्रहाबद्दल बोलताना अंबरीश मिश्र म्हणतात, "जागतिकीकरणामुळे भारताच्या सांस्कृतिक भावजीवनाला कीड लागली. शेकडो शतकांचं शहाणपण पोरकं झालं. महापुराच्या तडाख्यात सापडलेल्या झोपडीप्रमाणे देशाची अवस्था झाली. सोनवणे यांच्या कथांच्या केंद्रस्थानी माणूस आहे. देशभर प्रचंड उलथापालथ होत असताना माणसात, त्याच्या / तिच्या कळत नकळत झालेले बदल; एकीकडे नव्या युगाची आशा, तर दुसरीकडे सर्वदूर बेदिली; आपल्या वाट्याला आलेल्या सुख - दुःखाचा माणसाने लावलेला अर्थ; निरर्थकतेच्या बोगद्यातून सुरू असलेला नि कधीही न संपणारा जीवनप्रवास; सतत धारेला लागलेले सामाजिक, आर्थिक नि सांस्कृतिक व्यवहार; एकीकडे जगण्याला भिडण्याची जिद्द तर दुसरीकडे हतबलता; स्वप्नाचं गाठोड खांद्यावर टाकून माणसाची अंतहीन वणवण; श्रेयस प्रेयस यांच्यातला झगडा, असा एक मोठा पट सोनवणे वाचकासमोर मांडतात."[१] अंबरीश मिश्र यांची ही प्रतिक्रिया 'ब्रँड फॅक्टरी'चे स्वरूप सांगताना दिसते.

'ब्रँड फॅक्टरी' या कथासंग्रहाच्या शीर्षकामधूनच या कथासंग्रहाला जागतिकीकरणाचे संदर्भ आहेत असे दिसून येते. जागतिकीकरणामुळे मानवी जीवनावर होत असलेले परिणाम या कथा उलगडून दाखवतात. या कथासंग्रहातील पहिलीच कथा 'वेलकम टू कस्टमर केअर' यामध्ये अर्चना नावाची नायिका आहे. ती कॉल सेंटरमध्ये काम करते. कॉल सेंटरमध्ये काम करत असताना ती संवेदनशील असतानाही आपल्यातली संवेदनशीलता बाजूला ठेवून ग्राहकांशी बोलत राहते. कधी ती अर्चना म्हणून बोलते; तर कधी ती स्टेला म्हणून ग्राहकांशी संवाद साधताना दिसते. एखादा ग्राहक तिला मनातील गोष्ट सांगत असेल, कुठलीही अडचण सांगत असेल, अडचणीच्या वेळी मदत मागत असेल; तरीही ती ग्राहकाची मदत करू शकत नाही. वेळच्या वेळेला ग्राहकाचा फोन घेतला पाहिजे, त्याच्याशी गोड बोलले पाहिजे, वेळ प्रसंगी खोटे बोलले तरी चालेल; पण ग्राहकांना गुंतून ठेवून त्यांना या मायाजाळ्यामध्ये अडकवून ठेवले पाहिजे. कंपनीचा व्यवहार आणि व्यापार मोठा करण्यामध्ये स्वतः ला झोकून देणे,

त्यासाठी त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारा माणूस आहे; जो त्याच्या एका
एवढेच काम या कस्टमर केअरमधील मुलींना करावे लागते. अशा वेळी माणूस म्हणून अर्चना स्वत: कडे बघते तेव्हा तिला प्रश्न पडतो की आपण
एका मिनिटाचा हिशोब पाहताना दिसतो. सोनवणे यांची ही कथा लक्ष वेधताना दिसते.
माणूस आहोत का रोबोट ? माणसाचे यांत्रिकीकरण होत आहे याकडे जागतिकीकरणापासून फारकत घेतली. अर्चना त्यापैकी एक आहे;
जागतिकीकरणाचे दुष्परिणाम ज्यांना कळाले त्यांनी या मोहितच्या मोहपाशातही अडकत नाही. ती काकूबाई
त्यामुळेच कॉल सेंटरमधल्या इतर मुलींप्रमाणे ती पबमध्ये जात नाही आणि आपले आयुष्य जगताना दिसते.
नाही, ती मौजमजेपासुन बाजूला राहते, पार्टीपासून बाजूला राहते आणि धीटपणाने जागतिकीकरणाचे वास्तव मांडताना दिसते.

'ब्रँड फॅक्टरी' या कथासंग्रहातील 'कार्ल मार्क्सचा डोळा' नावाची कथा असेच नोकरीपासून दूर असणारा व्यक्ती कार्ल मार्क्सच्या सुहास मोरेश्वर देशमुख नावाचा २० पेक्षा जास्त वेळा इंटरव्ह्यू देणारा पण कार्ल मार्क्सने आपले उभे आयुष्य आहेरे आणि नाहीरे या डोळ्यांमध्ये प्रवेश करतो आणि त्याला जीवनाचे वास्तव, सत्य कळते. पण आता कार्ल मार्क्सच्या डोळ्यावर सुद्धा वर्गातील फरक सांगण्यासाठी घालवले, शोषणाची परंपरा आम्हाला दाखवून दिली; या काळ्या चष्म्याने झाकून टाकले हे वास्तव काळा चष्मा आला आणि त्यामागचे त्याने सांगितलेले खरेवास्तव जागतिकीकरणाच्या केवळ त्याला डोळा आहे म्हणून ! (आणि या सुहास देशमुखला कळते. त्यामुळेच तो म्हणतो. ''कार्ल मार्क्स मला का आवडतो ? आहेत म्हणून !) पण मी हे कसं सांगणार ? त्या डोळ्याच्या आवर्तनातून प्रकट होणाऱ्या खऱ्या, गहिऱ्या माझ्या तुमच्या वेदना कधीच दिसू नयेत म्हणून...''[२] कार्ल कारण मार्क्सच्या डोळ्यावर आता चष्मा आलाय ना, खरी आवर्तन आणि खऱ्या वेदना या काळया चष्म्याने झाकून टाकल्याचे मार्क्सने सांगितलेले कामगाराचे, कष्टकऱ्यांचे, माणसांचे खरे प्रश्न जागतिकीकरणाच्या कथाकाराला सुचित करायचे आहे.

या कथासंग्रहातील 'ब्रँड फॅक्टरी' ही कथा जागतिकीकरण आणि सर्वसामान्य माणसाचे जागतिकीकरणामध्ये होत असलेले शोषण याविषयी भाष्य करणारी आहे. मोहन प्यारे हा या कथेचा नायक, त्याची पत्नी राधा प्यारी व संदीप हा त्यांचा मुलगा असे हे सुखी कुटुंब आहे. समोरच्या बाल्कनीमध्ये राजू निवंगुणे आणि राणी निवंगुणे हे कुटुंब राहते. मोहन प्यारे नेहमीच राजू निवंगुणेचे कपडे पाहून, त्याचे राहणीमान पाहून प्रभावित होत असतो. राजू निवंगुणे हा नेहमीच फॅशनचे कपडे घालतो, आलिशान जीवन जगतो. ब्रँड म्हटलं जातं असा ब्रँडचा माणूस म्हणून राजू निवंगुणे मोहन प्यारेला नेहमी आकर्षित करत राहतो. पण मोहन प्यारे तसे जगू शकत नाही. राजू निवंगुणे ज्याठिकाणी नोकरीला आहे त्या पीजी ब्रँडमध्ये मोहन प्यारेला नोकरीला लागता आले नाही. त्याचे कारण त्याला खोटे बोलता येत नाही, त्याला चुकीचे वागता येत नाही, इंटरव्ह्यूमध्ये विचारलेल्या प्रश्नांची तो सरळ सरळ उत्तरे देतो. राजू निवंगुणे मात्र बेरकी आहे, तो खोटे बोलतो, ग्राहकांना फसवण्याची व कंपनीला फायदा करून देण्याची कला त्याच्यात आहे. जागतिकीकरणाची भिस्त अशा खोटेपणाच्या आणि शोषणाच्या पायावर उभी आहे. मोहन प्यारेसारखी माणसेही या जाळ्यात खेचली जातात. शेअर मार्केटमधल्या गुंतवणुकीची बातमी त्याच्या कानावर आल्यावर त्यालाही वाटते की, आपणही श्रीमंत व्हावे. बँकेच्या व्याजदरापेक्षा जास्त रक्कम याठिकाणी मिळते म्हणून तो स्वत:ची पत्नी राधा प्यारीशी चर्चा करून आपला सर्व पैसा शेअर मार्केटमध्ये गुंतवतो. शेअर मार्केटमध्ये रिस्क आहे हे त्याला माहीत आहे; पण शेवटी या जागतिकीकरणाच्या प्रभावाने, श्रीमंत व्हावे म्हणून, राजू निवंगुणेसारखं ब्रँडेड व्हावे असे त्याला वाटते; म्हणून तो सर्व पैसा शेअर मार्केटमध्ये गुंतवतो आणि शेअर मार्केट कोसळल्यामुळे सर्व पैसे बुडतात. अशावेळी राधा प्यारीचे पोष्टाच्या बचत खात्यातील पैसे त्याला कामी येतात, त्याचा संसार वाचवतात. जागतिकीकरणाने आणलेल्या या व्यवस्थेवर लेखकाने ताशेरे ओढले आहेत. ''ब्रँड फॅक्टरी राक्षसी आहे, मायावी आहे. तिचे तीक्ष्ण मायावी सेंसर सर्वत्र पसरलेत. त्यांनी चराचर व्यापलंय''[३] आणि यामध्येच माणसे ब्रँडच्या नावाखाली त्याच्याकडे आकर्षिले जातात व माणसाचे आर्थिक शोषण ही व्यवस्था करते.

जागतिकीकरणाने माणसाला मोहात पाडले. त्याला ब्रँडविषयी, जगण्याविषयी आकर्षण निर्माण केले. तसेच माणसातील माणुसकी संपवण्याचे कामही जागतिकीकरणाने केलेले दिसून येते. 'तुमचीच गोष्ट' नावाच्या कथेमध्ये मनोहर सोनवणे याविषयी प्रभावी भाष्य करताना दिसतात. या कथेतल्या नायकाची ओळख एका प्लंबिंग काम करणाऱ्या माणसाशी होते. एक दिवस त्याच्या घराचा नळ नादुरुस्त होतो तेव्हा हा नोकरी करणारा माणूस त्या प्लंबरला शोधत शोधत त्याच्या गल्लीमध्ये जातो. त्या गल्लीमध्ये त्याचे घर माहित नसतानाही सर्व गल्लीतील माणसे त्याची आदराने विचारपूस करतात, त्याला घरापर्यंत नेऊन सोडण्यापर्यंत मदत करतात, एकाला त्याचे घर माहित नाही तो दुसऱ्याला विचारतो पण माणसातली माणुसकी ती माणसे तसूभरही कमी होऊ देत

नाहीत. त्याला प्लंबिंग काम करणाऱ्या माणसाच्या घरापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था हा संपूर्ण मोहल्ला करतो. हा मोहल्ला स्वच्छ नाही, जागतिकीकरणाचा, उन्नतीचा प्रकाश या मोहल्ल्यात अजून पडलेला नाही. या मोहल्ल्यात अजून रस्ता नाही, इथल्या माणसांना पक्की घरे नाहीत; पण माणुसकीच्या बाबतीमध्ये ही माणसे फार श्रीमंत आहेत याची जाणीव या नायकाला होते; आणि या समतानगरमधल्या एक प्लंबरला घेऊन तो घरी येतो. तो माणूस कमी पैशांमध्ये याचे काम करून देतो. पुढे एकमेकात संबंध निर्माण होतात. समतानगरच्या विकासासाठी, या वस्तीसाठी हा नायक काही तरी करु इच्छितो. एक दिवस या प्लंबिंग काम करणाऱ्या माणसावर घर सोडण्याची पाळी येते, तेव्हा प्लंबिंग करणारा माणूस तुमच्या घरी रिकाम्या खोलीमध्ये चार आठ दिवसासाठी राहायला मिळेल का ? असे जेव्हा विचारतो. तेव्हा या नायकापुढे प्रश्न पडतो की, आता आपल्याला सोसायटीमधल्या लोकांना विचारावे लागेल, त्यांची मान्यता घ्यावी लागेल, सोसायटीमध्ये अशा वस्तीतल्या माणसाला राहायला होकार दिल्यामुळे आपल्याला सोसायटी काय म्हणेल ? या प्रश्नाने तो भंडावून जातो आणि त्या माणसाला खोली देता येणार नाही, अशा प्रकारचा निरोप देतो. त्यानंतर एकदिवस तो ऑफिसला गेल्यावर अचानक त्याला कळते, की समतानगर वस्तीतली सर्व माणसे आपल्या घरी आली आहेत. त्याला वाटते आपण खोली दिली नाही म्हणून ही माणसे परत आपल्यावर दबाव टाकत आहेत. सोसायटीमधली सगळी माणसे घाबरून गेली आहेत, माणसांची गर्दी बघून त्यांनी पोलिस स्टेशनला फोन केला आहे, सर्व पोलिस यंत्रणा त्याठिकाणी येते आणि समतानगर वस्तीतील सर्व लोक घुसखोरी करत आहेत अशा प्रकारची तक्रार अध्यक्षांकडून दिली जाते. या सर्व लोकांना मग तो सुभान्या असेल उस्मानभाई असेल, सर्व कामगारांना पोलीस पकडून नेतात. शेवटी नायकाला कळते की,समतानगर मधील लोक खोली मागायला आलेली नव्हती. या लोकांनी समतानगरमध्ये नायकाचा सत्कार ठेवलेला असतो, त्याचे आमंत्रण द्यायला ती आलेली असतात. म्हणजे माणसाला जागतिकीकरणाच्या, सोसायटीच्या जगण्याने माणसापासून तोडले, माणसांचे मन माणसांना कळत नाही, माणसांचे दुःख माणसांना कळत नाही, इच्छा असून सुद्धा एक माणूस दुसऱ्या माणसांना मदत करू शकत नाही ही सोसायटीची परिस्थिती; पण त्याच्या उलट परिस्थिती समतानगरची आहे. खरंच समतानगरमध्ये समता वसलेली दिसते. सोसायटीमध्ये मात्र कुठलीच समता दिसत नाही, माणसाविषयीचा कळवळा दिसत नाही. उलट ही माणसे कशासाठी आली, याची शहानिशा न करता त्या माणसांना बळाचा वापर करून पोलिसांच्या ताब्यात दिले जाते. जागतिकीकरणामुळे माणसापासून माणूस तोडण्याचे काम होत असल्याचे वास्तव मनोहर सोनवणे चित्रित करतात.

'अधांतर' नावाच्या कथेतील नायक शिक्षणासाठी गाव सोडतो. शिक्षणासाठी लागणारा भरमसाठ खर्च आणि तो न करू शकणारे शेतकऱ्याचे कुटुंब आणि त्यामुळे नायकाची होत असलेली वाताहत या कथेमध्ये चित्रित झाली आहे. प्रत्येक वेळी वर्षाची फिस लांबणीवर पडते, ती भरण्यासाठी काहीतरी तडजोड करावी लागते; आणि याचा फार मोठा ताण त्याच्या मनावर होतो. शिकावे की शिक्षण सोडून द्यावे या स्थितीपर्यंत नायकयेतो. त्याचा भाऊ दादा त्याला होईल तेवढी मदत करण्याचा प्रयत्न करतो; पण त्यालाही काही मर्यादा असतात. शेतीमध्ये उत्पन्न होत नाही, घर चालवण्यासाठीच धडपड करावी लागते. अशात त्याचे शिक्षण कसे करायचे ? असा प्रश्न निर्माण होतो. शेवटी त्याचे दाजी आणि भाऊ हे शेती विकली पाहिजे; त्याच्या वाट्याची शेती त्याच्या शिक्षणासाठी विकू अशा पद्धतीचा तोडगा काढतात. शिक्षणासाठी शेती विकण्याचा निर्णय घेतल्यामुळे पैशाचा प्रश्न सुटतो; पण या तोडग्यामुळे गावापासून तुटल्याचा भाव त्याच्या मनात निर्माण होतो. दाजीच्या व भावाच्या बोलण्यामध्ये व्यवहार आणि काळजी दोन्ही गोष्टी असल्या तरी यानंतर जमिनीचा तुकडा न राहणं त्याला बेचैन करून जातं. या त्याच्या अवस्थेविषयी लेखक लिहितो, "दादा आणि दाजींनी त्याला बसस्टँडवर सोडलं. तो खिन्नच होता. जमिनीचा तुकडा राहणं किंवा जाणं महत्त्वाचं नाही, घर परक होत असल्याची जाणीव त्याला खिन्न करत होती. त्याच्यासारखे अनेकजण जमिनीचे तुकडे विकून शिकतात. मोठे होतात. बबनसारखे काही जण घराला, गावाला परकं करतात, दादा आणि दाजी त्याच्याच भविष्यासाठी त्याला परकं करत होते का ?"[४] शिक्षणासाठी, माणसाच्या प्रगतीसाठी माणूस आपल्याच मातीपासून, मातेपासून, गावापासून परका होत चालला आहे हे वास्तव ही कथा मांडताना दिसते.

'रेणूची गोष्ट' ही कथासंग्रहातील कथा कामगार चळवळीचे नेते बाबासाहेब आणि त्यांची मुलगी रेणू आणि कथेतील नायक आनंद वाघमारे यांच्या जीवनावर, भावसंबंधावर भाष्य करणारी कथा आहे. जागतिकीकरणात कंपनीचा भर उत्पन्न वाढवण्यावर आणि कंपनीचे भले कसे होईल यावर असतो. कामगारांचे काय होईल आणि कामगारांचे प्रश्न याकडे कंपनी सराईतपणे डोळेझाक करत राहते. अशावेळी बाबासाहेबांसारखा कणखर कामगार नेता कामगारांचे प्रश्न हिरीरीने आणि प्रभावीपणे

मांडताना व सोडवताना दिसतो. पण असे कामगार नेते कंपनीलाच नको आहेत. अशावेळी कथेतील नायक आनंद वाघमारेचा वापर करून बाबासाहेबांना या कामगार नेते पदापासून हळूहळू दूर सारले जाते; आणि लाचखोर असलेला नवा कामगार नेता त्याठिकाणी नियुक्त केला जातो. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद या सर्व सूत्रांचा वापर कंपनी करताना दिसते. आनंदकडून तक्रार करावयास कंपनी भाग पाडते. काय षडयंत्र चालले आहे याची तिळमात्रही शंका आनंदला येत नाही आणि त्यामुळे कंपनीच्या जाळ्यामध्ये तो अडकत राहतो. कंपनी आणि कंपनीचे लोक याचा फायदा घेऊन कामगारांची चळवळ कमकुवत करतात, कामगारांमध्ये फूट पाडतात आणि लाचखोर अशा नेत्याला कामगारांचा नेता म्हणून निवडतात. हा बाबासाहेबांचा पराभव हा कामगार चळवळीचा पराभव आहे. कामगारांची चळवळ आता अशा माणसांच्या हाती गेली आहे ज्याला स्वतःचे घर भरण्यात रस आहे. यापेक्षा कामगारांशी त्यांची कुठलीही नाळ जोडली गेलेली नाही. कामगारांचे जीवन, त्यांचे खरे प्रश्न याविषयी कुठलीच जाणीव त्याला नाही. तो कामगार आणि कंपनीमधला लाचखोर दुवा आहे. असे अनेक लाचखोर दुवे कंपनी कामगार आणि कंपनी यांच्यामध्ये निर्माण करून कामगार चळवळी थंड केल्याचे वास्तव ही कथा चित्रित करते.

'मॉलमध्ये एकटं एक मूल' नावाची कथा या कथासंग्रहामध्ये आहे. मॉलमध्ये खरेदी करायला आलेल्या कुण्या स्त्रीचे किंवा पुरुषाचे खरेदीच्या नादामध्ये स्वतःच्या मुलाकडे दुर्लक्ष झाले आणि हे मूल पूर्ण मॉलमध्ये फिरत राहिले. शेवटी हा मोठा चर्चेचा विषय झाला. इतका की सर्व मॉलमध्ये दिवसभर त्या लहान मुलाचीच चर्चा झाली. पण सर्वजण मुलाविषयी जी संवेदना दाखवत आहेत ती संवेदना फक्त वरवरची आहे. मुळात ही सर्व माणसे संवेदनाहीन आहेत. फक्त फेसबुकवर, ट्विटरवर, चॅटिंगवर मुलाविषयीचा कळवळा दाखवला जातो. मात्र प्रत्यक्षामध्ये या माणसांना याविषयी कुठलाच कळवळा नाही. याविषयी लिहिताना लेखक म्हणतो, "असो, त्या मुलीला मॉलमध्ये एकट टाकणारी तिची आईच असेल, असं मानायचं कारण नाही. ते तिचे पप्पाही असू शकतील. आजी - आजोबाही असू शकतील किंवा बेबीसीटरही असू शकेल. कोणीही असू शकतं. दोष द्यायचाच तर मॉलला देता येईल किंवा बाजारयुगाला.... ब्लेम इट ऑन मार्केट.... त्याची गुंगी इतकी पुंगी आणणारी आहे की.... काय म्हणता ?"

या कथांप्रमाणेच या कथासंग्रहातील'मायावरण','मादाम फियरलेसचा फेरा','महायात्रा','माणूस मिसिंग' या कथाही जागतिकीकरणावर भाष्य करतात. एकूणच जागतिकीकरणाने माणसाला प्रगतीकडे नेले, प्रगतीच्या ओढीने माणसाने जागतिकीकरण स्वीकारले, संचय या आदिम प्रेरणेतून माणूस जागतिकीकरणाच्या जाळ्यामध्ये ओढला गेला. जागतिकीकरणाने अनेक फायदेही केले. ज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या, रोजगाराच्या, उद्योगाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये माणसाने प्रगती केली. जातीच्या, धर्माच्या, प्रांताच्या अनेक प्रथा परंपरा यांची बेडी जागतिकीकरणाने तोडली. अनेक सुखसोयी, सुविधा जागतिकीकरणाने निर्माण केल्या; पण याच जागतिकीकरणाने अनेक समस्या, अनेक प्रश्न सुद्धा निर्माण केले. मनुष्यप्राणी हा सृष्टीच्या केंद्रस्थानी होता, तो निसर्गसन्मुख होता. पण जागतिकीकरणाने माणसाला निसर्गापासून तोडण्याचे काम केले. माणूस हा केंद्रस्थानी न मानता यंत्र हे जागतिकीकरणाच्या केंद्रस्थानी मानले गेले. माणसापेक्षा यंत्र बरोबर आणि यंत्रापुढे माणूस चुकीचा हे ठरविण्याचे काम जागतिकीकरणाने केले. जागतिकीकरण मॉल, जिम, फॅशन शो, टीव्ही, शॉपिंग सेंटर घेऊन आले. मोबाईल, ट्विटर, फेसबुक, चॅटिंग, ऑनलाइन शॉपिंग सर्व घेऊन आले, यातून अनेक चुकीचे प्रकार सुद्धा होऊ लागले. अध्यात्म, माणुसकी, आदर, निती या गोष्टी हळूहळू व्यापारातून, व्यवहारातून हद्दपार व्हायला लागल्या. जगण्यापेक्षा माणूस कमावणे यावर जास्त भर देऊ लागला; त्यामुळे माणसाचे आयुष्यमान कमी झाले. काय खावे याकडे लक्ष देण्यापेक्षा काय काय खावे यावर भर दिल्यामुळे अनेक शारीरिक समस्या निर्माण झाल्या. संस्कृतीचे भलेमोठे बांधकाम जागतिकीकरणाच्या तीसचाळीस वर्षांमध्ये जमीनदोस्त झाले. भाषा आणि भाषिक अभिव्यक्ती, सर्जन आणि चिंतन या गोष्टी जागतिकीकरणाने संपवत आणल्या. शिक्षण ही माणसाला माणूस बनवण्याचे माध्यम राहता, पैसा कमवण्याचे साधन बनले. पैसा कमावणे, व्यापार वाढवणे आणि माणसांना माणसापासून विलग करणे अशा प्रकारची व्यवस्था निर्माण झाली. जागतिकीकरणाने कुटुंब व्यवस्था पूर्णपणे ढासळली. दुभंगलेली कुटुंबे आणि ढासळलेली मानसिकता ही जागतिकीकरणाची अपत्ये आहेत. या सर्व गोष्टींचा वेध आणि आढावा मनोहर सोनवणे यांनी 'ब्रँड फॅक्टरी' या कथासंग्रहामधून घेतला आहे.


गेल्या पाच दहा वर्षांमध्ये जागतिकीकरणाचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. बाकीच्या सर्व व्यवस्था जागतिकीकरणावर अवलंबून असल्यामुळे त्या जागतिकीकरणातले दुःख, जागतिकीकरणातून उध्वस्त होत असलेले मानवी जीवन प्रभावीपणे चित्रित करतीलच असे नाही. पण लेखक मात्र यापासून वेगळा असतो. तो माणसाला जीवन जगण्याचा मार्ग दाखवत असतो; आणि

समाजवास्तव नेहमीच समाजापुढे मांडत असतो. हे समाजवास्तव मांडण्यासाठी लेखक नेहमी समाजाशी, त्यातील वाईट प्रवृत्तीशी झगडत असतो. मनोहर सोनवणे यांनी हे काम प्रभावीपणे केलेले आहे. अलीकडच्या काळातील जागतिकीकरणाने निर्माण केलेले प्रश्न, जागतिकीकरणाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम ज्या साहित्यकृतीतून चित्रित होत आहे. त्यातील एक उत्तम साहित्यकृती म्हणून 'ब्रँड फॅक्टरी' नावारूपास येईल, याबद्दल तिळमात्र शंका नाही.

**संदर्भ :**

१) मनोहर सोनवणे, ब्रँड फॅक्टरी, विश्वकर्मा पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर २०२०, पृष्ठ १९
२) तत्रैव, पृष्ठ ६२
३) तत्रैव, पृष्ठ ७०
४) तत्रैव, पृष्ठ १०३
५) तत्रैव, पृष्ठ १३७

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com



अभिसरण

ISSN-2229-4856

# नव्वदोत्तर मराठी साहित्य

## चर्चा आणि मीमांसा

संपादक
**प्राचार्य डॉ. वसंत सानप**

कार्यकारी संपादक
**डॉ. गणेश मोहिते**

सहसंपादक
**डॉ. मनोहर सिरसाट**

नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा । अभिसरण - विशेषांक मे २०२२

| | | | |
|---|---|---|---|
| २० | 'आले ढग... गेले ढग' मधील सामाजिक प्रश्न | डॉ. एम.ए.कव्हळे | १०१ |
| २१ | कृषिव्यवस्थेतील वर्तमान वास्तव : 'या परावलंबी दिवसात' | डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे | १०४ |
| २२ | साहित्यकृती आणि चित्रपट निर्मिती | प्रा.डॉ.धोंडगे एम.बी.<br>कांदे केशव अंगदराव | १०९ |
| २३ | चरित्र -आत्मचरित्र : स्वरूप व संकल्पना | डॉ. सुनीता अंबादास बोराडे | ११२ |
| २४ | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितेला दिशा देणारी कविता: पिढीपेस्तरप्यादेमात | प्रा.बाळू मोहन तिखे | ११६ |
| २५ | "लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातून चित्रीत झालेले राजकीय वास्तव" | प्रा. संदीप परदेशी | १२० |
| २६ | लोककला तमाशाचे बदलते स्वरूप | तुकाराम हरिश्चंद्र देवकर<br>प्रो. एम. बी. धोंडगे | १२४ |
| २७ | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा | प्रा. लक्ष्मण गित्ते | १२७ |
| २८ | स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीत्वाचे दर्शन | कैलास मच्छिंद्रनाथ होके<br>प्रा.डॉ. बाळासाहेब जाधव | १३१ |
| २९ | जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी दलित कथा | प्रा.डॉ. संजय राजधर महाले | १३६ |
| ३० | 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी' (विशेष संदर्भ : 'साखरफेरा') | प्रा. महारूद्र सूर्यभान जगताप | १४२ |
| ३१ | दलित जाणिवा शब्दांकित करणारी निर्स्गार्कीत कविता : मोहाडी | प्रा.डॉ.प्रल्हाद दत्तराव भोपे | १४६ |
| ३२ | प्रा. वामन निंबाळकर : मूल्याधिष्ठित जाणिवा आविष्कृत करणारा मोठा कथालेखक | प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट | १५२ |
| ३३ | मानवी प्राक्तन शब्दबद्ध करणारी कविता- काळी माती निळे आभाळ | डॉ. गणेश मोहिते | १५५ |
| ३४ | मार्ग कादंबरीतील पर्यावरणवादी विचार | प्रा.सौ. विलिना इनामदार | १६० |
| ३५ | "1990 नंतरच्या कथेचा अभ्यास" | प्रा. डॉ. शंकर शिवाजी मुंडे | १६९ |
| ३६ | मोतीराज राठोड यांच्या वैचारिक साहित्यातील विमुक्तांचे जीवनमूल्ये | डॉ. आकाश ब. पवार | १७४ |

# 'आले ढग... गेले ढग' मधील सामाजिक प्रश्न


## डॉ. एम.ए.कव्हळे

सहयोगी प्राध्यापक

सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव


डॉ. प्रल्हाद लुलेकर हे एक समीक्षक व कवी म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांच्या नावावर 'आले ढग... गेले ढग' हा एकमेव काव्यसंग्रह असला तरी त्यांची कलात्मक उंची फार मोठी आहे. 'आले ढग... गेले ढग' हा दीर्घकवितांचा संग्रह असून, त्यामध्ये एकूण पंधरा दीर्घ कवितांचा अंतर्भाव आहे. हा कवितासंग्रह नव्वदोत्तर मराठी दीर्घ कवितेच्या प्रवाहात अतिशय महत्वाचा आहे. डॉ. प्रल्हाद लुलेकर हे सामाजिक बांधिलकी मानणारे कवी आहेत. याचा प्रत्यय त्यांच्या कवितासंग्रहातील कविता वाचतांना येतो. त्यांच्या सर्वच कवितांमधून सामाजिक भान आणि सामाजिक वास्तव आविष्कृत होते.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे. त्यामुळे त्याला बळीराजा म्हटले जाते. पण या राजाला समाजामध्ये नोकरापेक्षाही हीन वागणूक दिली जाते. समाजच काय पण निसर्गही त्याला छळतो. याचे चित्रण पहिल्याच कवितेमध्ये आले आहे. शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. कधी ढग येतात पण पाऊस पडत नाही तर कधी आवकाळी पावसाने पिकांचे नुकसान होते. लहरी निसर्ग शेतकऱ्यांचे नेहमीच शोषण करतो. याचे चित्रण 'आले ढग... गेले ढग' या कवितेमध्ये यथार्थपणे आले आहे. शेतकरी हा राजा असून तो इतरांनाच साहेब म्हणतो. कंडक्टर पासून तहसीलदाराच्या चपराशापर्यंत सर्वांना तो साहेब म्हणतो. पण हे सर्व त्याची पिळवणूक करतात. एवढेच काय,

'तो देवाला बोलावतो देवाचा धावा करतो
देव त्याला अंगठा दावतो"१

हे वास्तव कवीलेखणीतून सुटत नाही. अशाच वास्तवाचे चित्रण करणारी 'चिरस्थायी अपंगत्वाच्या नावाने' ही कविता आहे. आपण म. गांधीजीच्या विचारांचा कसा गळा कापत आहोत ? याचा प्रत्यय या कवितेतून येतो. गांधीना शोषणरहित समाज हवा होतो. आम्ही मात्र शोषण, भ्रष्टाचार, बाई, बाटली, पैसा यांच्या गर्तेत अडकलो आहोत. ही खंत कवीमनात सलत आहे. आम्हाला गांधीविचाराच्या कुबड्या मिळाल्या आहेत म्हणून आम्ही अपंग वर्ष साजरे करत आहोत पण,

'त्याचे विचार
प्रत्यक्षात आणण्याचे धाडस
आमच्यात नाहीय
आम्ही त्यांच्या कुबड्यावर
चालतो आहोत'२

त्यामुळे हे अपंग वर्ष नाही तर हे भारतीय बुरख्यांचे वर्ष आहे, असे कवीला वाटते. 'साहेब आले साहेब गेले' ही अशाच आशयाची कविता आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक गोरे साहेब आम्ही पाहिले. पण स्वातंत्र्यानंतर आपले साहेब येतील, आपला विकास करतील, ही सर्वसामान्य भारतीयाची अपेक्षा होती. पण

ही अपेक्षा लवकरच मावळली. आपले भारतीय साहेब आले पण तेही जुन्याच वळणावर गेले. आमच्या मतांवर निवडून आलेले आमचेच साहेब आम्हाला भेटेनासे झाले. आम्ही मात्र आश्वासनावर भाळलो, वेडे ठरलो. ही राजकारणातील स्थिती कवीने सूक्ष्मपणे टिपली आहे. असे असतानाही भारतीय तरुण मात्र शांत आहे.

'लाचारीची गावक्षे त्याला तुष्टवतात
आणि तोंडी मात्र असते
गर्भगळीत तारुण्याची
गर्भ हरवलेली क्रांतीची भाषा'३

ही येथील तरुणांची स्थिती आहे. पण कवी याबद्दल आशावादी आहे. या गर्भातून नवा पुरुषार्थ जन्मेल आणि त्याचा सर्व अनिष्ठांना विरोध असेल, या नकारातून नवे समर्पण जन्मेल आणि

"या समर्पणाला स्पर्श असेल
या समर्पणाला गंध असेल......
सावित्रीबाईच्या जाणीवेचा आणि
ज्योतीबाच्या क्रांतीचा'४

अशी आशा कवीला आहे. पण काळोख झपाट्याने आपला पाठलाग करतो आहे. या काळोखाने अनेकांना काळोख बनविले आहे,

'काळोख
भविष्य वांझ करणारा
स्वप्नांना चिरणारा.'५

या काळोखाला आपण धैर्याने सामोरे जायला हवे. नाहीतर हा काळोख आपले भविष्यच संपवून टाकेल ही चिंता कवीला अस्वस्थ करत आहे. हा काळोख शैक्षणिक क्षेत्रातही शिरला आहे. शिक्षकांचा गौरव म्हणून आपण शिक्षक दिन साजरा करतो. आदर्श शिक्षकांना पुरस्कार देतो. पण यामध्येही काळोखाचेच राज्य आहे. साहेब आणि पुढाऱ्यांची मर्जी राखावी लागते, हे वास्तव आहे.

'कॅपीटेशन फी.... कोचींग क्लासेस...
एक्सामिनरचा शोध... मेरीट लिस्ट
केवळ 'मनी' वर चालते
साने गुरुजींचा नाही
नाणे गुरुजींचा जमाना आहे.'६

ही शिक्षणक्षेत्रातील वास्तवता कवीने चित्रित केली आहे. पण याचा अर्थ चांगले शिक्षक नाहीत असा होत नाही. आजही चांगल्या शिक्षकांची संख्या जास्तच आहे.

डॉ. प्रल्हाद लुलेकर हे प्राचार्य नरहर कुरुंदकरांचे शिष्य आहेत. या कवितासंग्रहात नरहर कुरुंदकरावर एक कविता आली आहे. गुरुविषयी वाटणारा आदर आणि जिव्हाळा या कवितेतून नैसर्गिकपणे अविष्कृत झाला आहे. कुरुंदकर गुरुजींच्या विद्वत्तेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणताही विषय ते सहजतेने हाताळत. त्यामुळेच आणीबाणीच्या काळात इसापनिति या विषयावरून त्यांनी आणीबाणी विरोधी भूमिका मांडली.

समाजातील दुःखे मातेच्या नात्याने समजून घेणारे ते अभ्यासक होते. त्यामुळेच त्यांच्या जाण्यामुळे अनेक लोक मोठ्या हुद्द्यावर गेले,

'पण आम्ही पोरके झालो'

कारण मातेची ममताच नाहीशी झाली. अशी कवीची अवस्था आहे..

मराठवाड्याविषयी कवीच्या मनामध्ये आत्यंतिक श्रद्धा आणि प्रेम आहे. 'कासीम रजवीशी बातचीत' या कवितेतून याचा प्रत्यय येतो. कासीम रजवी मराठवाड्यात जन्माला आला आणि त्याने येथील लोकांवरच अत्याचार केले. पण कवी म्हणतो, कासीम रजवी हा तुमचा दोष नाही, 'दोष होता सत्तेच्या मस्तीचा'. सर्व गोष्टींनी समृद्ध असणारा मराठवाडा सर्वांनीच लुटला आहे. त्यामध्ये निजाम राजवटीची भर पडली. स्वातंत्र्योत्तर काळातही त्यामध्ये फारसा बदल झालेला नाही. जाती, धर्म, राजकारण यामध्ये अजूनही अनेक कासीम रजवी शिल्लक आहेत. त्यामुळे मराठवाड्याला आता नव्या कासीम रजवीविरुद्ध लढण्यासाठी सिद्ध व्हावे लागेल. त्याची मानसिक तयारीही चालू आहे. फक्त गरज आहे नव्या स्वामीजीची असे कवीला वाटते. कासीम रजवीप्रमाणे येथील संस्कृतीचाही विनाश करायला पाहिजे. कारण ही संस्कृती आजपर्यंत आमच्या पूर्वजांचे रक्तमांस खाऊन पुष्ट झाली आहे. पण आज बाबासाहेबांच्या विचारामुळे आम्ही याविरुद्ध विद्रोह करत आहोत आणि उद्या तर आमची सावलीही तुम्हाला दिसणार नाही, कारण

'आम्हालाही जीवनाचे अर्थ कळालेत,
वेदनेच्या हुंकाराने तुम्हीच संपून जाल'...७

असा विद्रोह 'काल, आज आणि उद्या' याकविततेत पहावयास मिळतो. या विद्रोहातून मोगडा चालेल. हा मोगडा सर्व अन्यायाची, बाजारी ढोंगीपणाची, भ्रष्टाचाराची बेटं उखडून टाकेल आणि नव्या जीवनाचा आरंभ होईल अशा आशावाद कवीला आहे.

डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी या कवितासंग्रहामध्ये समाजजीवनाचा सर्वांगिण वेध घेतला आहे. समाजजीवनाचे प्रत्येक क्षेत्र भ्रष्टाचाराने गिळकृत केले आहे. स्वातंत्र्य, समता, लोकशाही या संकल्पनाच बदलून टाकण्याचे काम येथील राजकारण्यांनी केले आहे. त्यामुळे सामान्य माणूस यामध्ये भरडला जातो आहे. या समाजवास्तवाचे सूक्ष्म दर्शन त्यांच्या आले ढंग.. गेले ढग' या काव्यसंग्रहातून घडते. त्याचप्रमाणे त्यांची कविता समाजपरिवर्तनाचा विचार मांडते. वासुदेव मुलाटे यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, "प्रल्हाद लुलेकर सामाजिक बांधिलकी मानणारे कवी, लेखक, विचारवंत व कार्यकर्तेही आहेत. परिवर्तनवादी चळवळीशी त्यांचे नाते दृढ स्वरुपाचे आहे. मराठी कवितेच्या एका महत्वाच्या टप्प्यावर त्यांची ही कविता सम्यक क्रांतीसाठी आवाहन करत करत आपली पदचिन्हे ठोसपणे उमटवील असा विश्वास वाटतो. "८

**संदर्भ :**

१) लुलेकर प्रल्हाद जी., 'आले ढग गेले ढग', नाथ पब्लिकेशन, औरंगाबाद. पुष्ठ १९.
२) तत्रैव, पृष्ठ २४. ३) तत्रैव, पृष्ठ २७.
४) तत्रैव, पृष्ठ ३०. ५) तत्रैव, पृष्ठ ८८.
६) तत्रैव, पृष्ठ ६०. ७) तत्रैव, पृष्ठ ७०.

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**● Mailing Address ●**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | २००० नंतर ललितगद्यातील बदलते चित्रण | ज्योती सुधाकर चव्हाण | 149-153 |
| 31 | एकविसाव्या शतकातील ' सर्व प्रश्न अनिवार्य' | अंगद श्रीपती भुरे | 154-159 |
| 32 | मराठी साहित्यातील विविध प्रवाह: स्थितीगती आणि मूल्यमापन. | ज्ञानदेव रामभाऊ रणशूर<br>डॉ. भाऊसाहेब राठोड | 160-163 |
| 33 | देशीवाद आणि समकालीन मराठी कादंबरी | वऱ्हाडे बापुराव भास्कर | 164-167 |
| 34 | आदिवासी कथा साहित्याचे स्वरूप | शंकर रामजी बर्गे<br>डॉ.एम.ए.कव्हळे | 168-171 |
| 35 | बालकिशोरांची अवकाशज्ञानाची जिज्ञासापूर्ती करणारा काव्यसंग्रह- 'आकाशगंगा ' | प्रा.पुरुषोत्तम प्र. सूर्य | 172-175 |
| 36 | समकालीन व्यक्तिचित्रे : एक आकलन | भगवान मुरलीधर बांगर<br>डॉ. भाऊसाहेब राठोड | 176-179 |
| 37 | समाजव्यवस्थेची कानउघाडणी:बिघडलेले होकायंत्र | मधुकर बालासाहेब जाधव<br>डॉ.ललित अधाने | 180-182 |
| 38 | २००० नंतरचे आदिवासी साहित्य | बागुल कौशल्या तुळशीराम<br>डॉ.भाऊसाहेब विठ्ठलराव गमे | 183-186 |
| 39 | साहित्यातील विविध प्रवाह : २००० नंतरची निर्मिती,स्थितीगती आणि मूल्यमापन | शैलजा सटवा ओव्हाळ<br>डॉ.मनोहर सिरसाट | 187-193 |
| 40 | २००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्यातील कादंबरी | सौ.विजया योगेश साळोखे | 194-196 |
| 41 | २००० नंतरच्या भटक्याविमुक्तांच्या कवितेतून प्रकट होणारे अनुभव विश्व | मनोज रामजी मुनेश्वर | 197-203 |
| 42 | " २००० नंतरच्या निवडक स्त्रीवादी कादंबऱ्या " | अंजली विठ्ठलराव मुसांडे | 204-209 |
| 43 | इ.स. २००० नंतरचे स्त्रीवादी साहित्य | शिंदे अनिता पर्वती<br>प्रा.डॉ.बालाजी नागटिळक | 210-214 |
| 44 | २००० नंतरची मराठी कादंबरी आणि किशोरवयीन व्यक्तिरेखा | श्री. सुनील अंबादास आहिरे<br>डॉ.किरण नामदेव पिंगळे | 215-221 |
| 45 | शांता जर्नादन शेळके: व्यक्ती आणि वाङ्मय | सौ.अंजली माधव देशपांडे | 222-223 |
| 46 | जागतिकीकरणात मराठी साहित्य आणि संस्कृतीचे अस्तित्व | डॉ.बी.जी.श्रीरामे | 224-227 |

# आदिवासी कथा साहित्याचे स्वरूप

**डॉ.एम.ए.कव्हळे**
संशोधन मार्गदर्शक
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव

**शंकर रामजी बर्गे**
संशोधक विद्यार्थी
नांदेड

## प्रास्ताविक :

साठोत्तरी साहित्याने मराठी साहित्य प्रवाहाला वेगळे वळण दिले.त्याची कारणेही तसीच होती.साठोत्तरी साहित्य प्रवाहामध्ये दलित साहित्य,ग्रामिण साहित्य, आदिवासी साहित्य,स्त्रीवादी साहित्य, भटके विमुक्तांचे साहित्य, जनवादी साहित्य, मुस्लीम साहित्य, ख्रिश्चन साहित्य,विज्ञानवादी साहित्य असे अनेकविध प्रवाह निर्माण झाले. या साहित्य प्रवाहाने स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आणि मनोरंजनवादी साहित्याला बाजूला करत आपली नवीवाट निर्माण केलेली आहे. त्यामुळे आदिवासी साहित्यानेही आपला स्वतंत्र प्रवाह निर्माण करत वेगळे स्थान निर्माण केले आहे. आदिवासी साहित्य प्रवाहाने लक्षणिय साहित्य निर्माण केलेले आहे.त्या साहित्य प्रवाहातील जाणिवा, प्रेरणा व साहित्य प्रवाहाची गती यातून आदिवासी कथा, कादंबरी,नाटक,आत्मकथन,कविता,वैचारिक लेखन इत्यादींच्या माध्यमातून आदिवसी कथाने वेगळे अस्तित्व निर्माण केलेले दिसून येते.

आदिवासी कथांमधून आदिवासी जीवनाची अनुभूती अविष्कार घडलेला आहे.त्याचे मूळ कारण म्हणजे ''शेती व्यवसायात शेतजमीन, शेतीत राबनारा शेतमजूर, शेतीसाठी लागणारे भांडवल आणि शेतीचे संयोजन या आर्थीक घटकापासून सर्वसामान्य माणसे वंचित होती. शिवाय वाहतुकीच्या सोयीदेखील उपलब्ध नव्हत्या''[१] म्हणून आदिवासी पूर्वीपासून या सोयीसुविधा पासून वंचित आणि उपेक्षित राहिलेला आहे.

## आदिवासी कथांचे स्वरूप :

आदिवासी कथा या 'अदिम' संवेदनातून निर्माण झालेल्या आहेत.या कथातून आदिवासी जमातीचे जीवन त्यांचा निसर्गाशी असणारा घनिष्ठ संबंध.त्यांची संस्कृतीचे विविध रूपे, आपल्या जमातीत असणा-या पारंपारिक रूढी, प्रथा परंपरा या कथेच्या आशयाच्या माध्यमातून मांडण्यात आलेल्या आहेत. या मराठी कथेतून आदिवासीच्या जगण्याचे प्रश्न उभे केलेले आहेत. ''ग्रामजीवन एकेकाळी लोकसंस्कृतीमुळे संपन्न आणि समृध्द होते. परंतू १९८० नंतर ही लोकसंस्कृती आतून-बाहेरून बदलली . काळाच्या ओघात अस होणे अटळ असले तरीसुध्दा बहूवंशी चांगला भागही नामशेष झाला. परंपरागत करमणूकीचे साधने संपुष्टात येऊन त्यांची जागा भौतिक साधनांनी घेतली. पारंपारिक सण- उत्सवाचे स्वरूपही त्यामूळे बदलत गेले.''[२] म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात होणा-या बदलांचे परिणाम आदिवासीवर अधिक प्रमाणात झालेले आहेत. आदिवासींचे राहणीमान खानपानाबरोबर त्यांच्या असणा-या स्वतंत्र बोलीवर इतर भाषेचा प्रभाव पडला आहे. परिणामी त्यांची भाषा ते बोलण्यासाठी लाजत आहेत.

मराठी आदिवासी कथांचे स्वरूप व विशेष पाहता सुरूवातीस समग्र आदिवासी साहित्याचा विचार करावा लागतो. या समग्र आदिवासी साहित्य प्रवाहाचा विचार केल्यास असे दिसून येते की आदिवासी संस्कृती ही आदिवासींचा आत्मा आहे. सर्व साहित्याचे मूळ हे आदिवासी जीवनावरच आधारित असावे असे वाटते. त्याचे कारण म्हणजे आदिवासी संस्कृती ही 'अदिम' म्हणजे अतिप्राचिन स्वरूपात आढळते.इतर साहित्य प्रकाराचा विचार करता असे लक्षात येते की कोणत्याही साहित्य प्रकाराचे मूळचे दोन भाग पाडलेले आहेत. एक म्हणजे मौखिक परंपरा आणि दुसरी म्हणजे लिखित स्वरूपाची परंपरा होय. आलीकडच्या काळामध्ये आदिवासी कथा साहित्याचा विचार करता आदिवासीच्या मौखिक परंपरेचे रूपांतर त्यांच्या आत्मविष्काराचे प्रतिबिंब झालेले आहे असे म्हणावे लागते. यावर आदिवासी समाजाची व्याख्या करताना विनायक तुमराम म्हणतात की, "कालचे संदर्भ आजच्या उजेडात तपासण्यास सज्ज झालेल्या आदिवासींच्या सामुदायिक निर्णयाचे वाड्मयीन रूप म्हणजे आदिवासी साहित्य होय. गिरिकुहरात व जंगल जिव्हा-यात ज्यांच्या आयुष्याचा अर्थ जन्मला व तेथेच विझून गेला, अशा मानवसमूहांची कैफियत मांडणारे साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य. आदिवासी साहित्य हे आदिवासी समूहाचे क्रांतीकारी साहित्य होय."[३] आदिवासी साहित्याचे स्वरूप हे अतिशय समर्पकपणे विनायक तुमराम यांनी आपल्या व्याख्येवरून स्पष्ट केले आहे. भारतातील आदिवासी जमाती व त्यांच्या भाषा तसेच जगातील आदिवासी जमाती व त्यांच्या बोली भाषा हे आदिवासी साहित्याच्या कक्षा रूंदाविणारे साहित्य होय. त्या साहित्यामध्ये खास करून आदिवासी कथांचा समावेश होतो हे विशेष आहे. या आदिवासी कथामधून पूर्वजांचा अलिखित खजीना व त्यांच्या शौर्याच्या गाथा,इतिहास, लोककथा, लोकगाणी, त्यांचे विविध लोकरंजन निसर्ग या सर्वाचा कथामध्ये वापर करून आदिवासी कथा या स्वरूपबध्द झालेल्याआहेत. ''आदिवासी साहित्य ही कोणतीही प्रकृती नाही. कोणत्याही प्रेरणांचा अविष्कार नाही.ते स्वतंत्र , स्वंयभूत व स्वयंसिध्द आहे. त्यांच्या प्रेरणा त्यांच्या अस्तित्वाइतक्याच प्राचीन व पृथक आहेत.या साहित्याने आज भारतीय साहित्याच्या इतिहासात मानाचे स्थान कायम केले आहे हे सांगून टाकले पाहिजे.आदिवासी साहित्य हे या देशातीलच नव्हे, तर आखिल विश्वातील मूळ मानव समूहांचे व टोळ्यांचे सांस्कृतीक मूल्यांनी नटलेले नवे जूने साहित्य एवढे व्यापक त्याचे स्वरूप आहे."[४] म्हणजेच आदिवासी साहित्या बरोबरच आदिवासीचे कथा साहित्य आदिमता आणि आधुनिकता या मुल्यनिकषांना आपल्या कवेत घेते. आदिवासी साहित्याने आपली कक्षा वाढविलेली आहे हे खालील विवेचनावरून लक्षात येते.

**आदिवासी कथासंग्रह :**

आदिवासी कादंबरी,नाटक,आत्मकथन,कविता या बरोबरच काही आदिवासी लेखकांनी कथालेखन केलेले आहे.त्यामध्ये 'अहेर ' उषा किरण आत्राम, 'आदोर' नजूबाई गावित, 'आकांत' बाबाराव मडावी, 'सर्वा' माधव सरकूंडे, 'वादळ' गोपाळ गवारी, 'पितळ' संजय दोबाडे, 'भोग-या' सुनिल गायकवाड, 'भाकर' बाबाराव मडावी, 'गल्लूर' सुनिल गायकवाड, 'नवसा भिल्लीणीचा एल्गार' नजूबाई गावित, 'आदिरंग' विश्राम वळवी, 'आदिवासी माणसाची कहाणी' अ.ध.वसावे यासारख्या लेखकांनी आदिवासी

कथा साहित्याला समृध्द केले आहे.

**१. भोग-या :**

भोग-या या कथासंग्रहातून सुनिल गायकवाड यांनी एकूण पंधरा कथांची मांडणी केलेली आहे. त्यामध्ये वेटर धाड, पेटीवाल मास्तर, गुलब्या, शामी-गोंडा, झिप-या मुरळी, इमानं डाकीण, कोयता, किन्नर, केलताडाचं फुल, झगडा भोग-या, मिरधा या कथांचा समावेश होतो. या आपल्या कथाबद्दल अभिव्यक्त होतांना सुनिल गायकवाड म्हणतात की, ''वास्तव जीवन जगतांना मिळणा-या जखमा हाच माझ्या कथांचा उगम. मन अस्वस्थ होऊ लागलं अन खदखदणारं मन जाणीव करून देऊ लागलं या आपल्या आदिवासींच्या व्यथा, त्या कथांच्या रूपात मांड. मग भोग-याच्या रूपानं आदिवासी संस्कृती जनमानसाच्या वाचकांच्या संवेदनशील मनाला कळावी.आदिवासीने हाजारो वर्षापूर्वी समाजबांधवाचे लग्नास आलेले पोरे-पोरी एकत्र आणून 'भोग-या' सुरू केला तो आजपर्यंत मी पाहतो. सधन समाज आदिवासींचे अनुकरण करून मोठ-मोठाले वधू-वर मेळावे भरवायला लागले.म्हणजे आदिवासी संस्कृती लोकांना पटायला लागली.असो. तळमळीने आत्मभान ठेवून जीवनानुभव देणारा माझा भोंग-या समस्त आदिवासी दलित, ग्रामिण,मराठी, बोलीभाषाचे प्रतिनिधित्व करणारा संग्रह असावा.कधी-कधी मनातला विद्रोह कथानकात दिसून येतो. कारण तेच 'कधलोग' झोपेल भील समाज अजोन कितलक आंगोटं कापीसन दी. तेला लेखनी अन.तिरकामठा उचलोनी गरज स.''[५] आणि ही गरज लक्षात घेऊन सुनिल गायकवाड भिल जमातीचे विवाह प्रथांचे आयोजन करून समाज प्रबोधन आपल्या कथेंच्या माध्यमातून करत आहेत. म्हणजे आपल्या कथेमधून प्रश्न विचारत मनाला छेद देण्याचे काम केलेले आहे.

**२. ताडमं :**

ताडमं हा कथासंग्रह माधव संरकूंडे यांनी लिहिलेला आहे. यातून एकूण नऊ कथांची मांडणी त्यांनी केलेली आहे.त्यामध्ये ताडमं, मेदड, माय, तळं, जागल, काटा, गोटयाच्या चुली,मी मेलोच नायी, करणी या सारख्या कथा त्यांच्या कथासंग्रहात दिसून येतात. या आपल्या कथा संग्रहाबद्दल माधव सरकूंडे म्हणतात की, '' 'ताडमं' हा कथासंग्रह खरं म्हणजे व्यथासंग्रह आहे. माझ्या भोवतालच्या माणसांच्या आयुष्याचा पट आहे. त्यातले बरेच माणसं माझ्या नात्याचे आहेत. काहींच्या योगायोगे भेटी झाल्या. ही माणसं माझ्या मनात कुसळासारखी रूतत होती. निमूटपणे सारे काही सोसण्यांची त्यांची पध्दत मला अस्वस्थ करून टाकत होती. मन मोकळ करण्यासाठी या माणसांच्या व्यथा मी कागदावर उतरविल्या, त्याच्या कथा झाल्या. 'तळ' 'ताडमं' 'माय' 'जागल' या कथामध्ये मी स्वतः वावरलो. 'मी मेलोच नायी' ही कथा मेळघाटातील कोरकू आदिवासींची आहे. 'काटा' ही कथा किनवट-उमरखेड जंगलात राहणा-या एका नातलगाची आहे.''[६] अशा विविध कथाचे विस्तारित रूप त्यांनी 'ताडमं' मधून मांडले आहे.विशेष करून 'ताडमं' म्हणजे पक्षी पकडण्याचे जाळे आहे. एकीकडे आदिवासी संस्कृती तर दुसरीकडे आदिवासी पकडण्यासाठी या व्यवस्थेने लावलेले जाळ असा दुहेरी अर्थ निघणारा हा कथासंग्रह आहे.

**३. आदिरंग :**

आदिरंग हा कथासंग्रह विश्राम वळवी यांनी लिहलेला आहे.यामध्ये एकूण सोळा कथांचा समावेश त्यांनी केलेला आहे. 'जुलूम भूक' 'कमली' 'कोमल संवेदना' 'सिकलसेल' 'डाकबंगला' 'वादळवारा' 'आपबीती' 'याच्चा मी इथंच आहे!' 'जन्म दात्यांचे दुःख' 'वास्तव' 'मृत्यूपूर्व जबाब' 'शिकार' 'आदिवासी लोककथेतील-काव्यामेध' 'साला बिलंदर' 'सोनाराला भेटला लोहारं' 'मामाची छत्री (हरवली)' 'होय ! मी काजरसिंग नाईक बोलतोय' या अशा कथांचा समावेश त्यांनी आपल्या कथासंग्रहात केलेला आहे. विश्राम वळवी यांच्या कथेचे वैशिष्टये त्यांच्या कथेच्या शिर्षकावरूनच आदिवासी जीवनाचा प्रत्यय येतो. विश्राम वळवी यांच्या आदिरंग या कथासंग्रहावर पुष्पा गावित आपले मत व्यक्त करतांना म्हणतात की, ''आधूनिकतेच्या आहरी गेल्यावर मुले आई-वडिलांना विसरतात हा विषय 'जन्मदात्याचे दुःख' या कथेत येतो. 'मृत्यूपूर्वी जवाब' या कथेत आपल्या नव-याने दुसरी बायको केली म्हणून आत्महत्या केली असे सांगणारी स्त्री मृत्यूपूर्वी जबाब देताना कथा लेखकाला हळूच सांगते 'मला नव-याने मारले पण मुलासाठी मी खोटं बोलले' या कथेत मृत्यू-हदयी आईची मुलांविषयी काळजी व्यक्त होते. 'कोमल संवेदना' या कथेत आपल्या जावई आणि मुलीच्या संभाषणाने दुखावलेली आई मुलासारख्या जावयाची क्षमा मागते.''[७] या सा-यांचा उलगडा थोडक्यात आणि मोजक्या शब्दातून आदिवासींचे जगणे पुष्पा गावित यांनी निरीक्षणांती मांडलेले आहे.

सारांश रूपाने असे म्हणता येते की, आदिवासी समाज आणि संस्कृतीला अतिशय महत्वाचे स्थान आदिवासी कथांमधून दिलेले आहे.ख-या अर्थाने स्वातंर्त्योत्तर कालखंडा पासून ते आजतागायत त्यांचे होणारे शोषण आणि त्यांच्यावर केलेले भाषण हे आशावादी आहे.

**निष्कर्ष :**

१. आदिवासी साहित्य प्रवाहातून कथा हा साहित्य प्रकार वेगळा आहे.

२. आदिवासी कथेतून आदिवासी समाज संस्कृतीची मांडणी अधिक दिसते.

३. आदिवासी कथा साहित्य हा प्रकार अधिक तीव्र होताना आढळतो.

## संदर्भ ग्रंथ यादी

१. पंचधारा, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, तेलंगणा. आक्टो ते डिसेंबर २०११ पृ. क्र.४२

२. कदम वैजनाथ, प्रास्ताविक बदलती ग्राम संस्कृती ,साक्षात प्रकाशन औरंगाबाद पृ.क्र.०९

३. मुनघाटे प्रमोद, (संपा) आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या, अरूण पारगांवकर प्रकाशन पुणे, प्र.आ. जानेवारी,२००७ पृ.क्र. ३८

४. तत्रैव पृ.क्र.३९

५. गायकवाड सूनील, भोग-या, मेधा पब्लिशिंग हाऊस,अमरावती-६ पृ.क्र. १०

६. सरकुंडे माधव- ताडमं, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. प्रस्तावना.

७. वळवी विश्राम, आदिरंग. अथर्व पब्लिकेशन पृ.क्र.९

◈◈◈